# बाल रंगभूमी १

## शाम फडके



म. ग्रं. सं. ठाणे
विषय बा. वा.
ग्रा. क्र. १६८६५
IRBK-0116865

# बालरंगभूमी

## भाग १ ला

नाट्याभिनयाचे खेळ

व

एक प्रवेश

फक्त दोन पात्रांचा

लेखक

श्याम फडके

किमत १ रुप

IRBK-0116865

राजचंद्र प्रकाशन, ठाणे २

प्रकाशक :

श्री. श्याम फडके

राजचंद्र प्रकाशन

इंदिरा निवास, नौपाडा

ठाणे ४०० ६०२

© श्याम फडके १९७५

प्रथमावृत्ती दसरा १९७५

मुखपृष्ठ : रमेश मुधोळकर

सूचना : या पुस्तकातील प्रवेश विनापरवानगी करणे
ह्या कायदेशीर गुन्हा आहे याची नोंद घ्यावी.

[ सरकारी स्वस्त कागदाचा
या पुस्तकात वापर केलेला आहे.]

मुद्रक :

श्री. र. भ. निगुडकर

३९५/४ सदाशिव पेठ

पुणे ४११०३०

म. ग्रं. सं. आणि, वाचनालय शाखा
प्र. क्र. ९६८६९ बा-वा
नों. दि. २३/८/८६

# ' नाट्याभिनयाचे विविध खेळ. '

मुलांनो,

तुम्हाला नाटक बघायला फार आवडतं. गणपती उत्सवात रोज रात्री तुम्ही नाटक बघायला पळत जाता. शाळेतल्या स्नेह-संमेलनातलं नाटक हौसेनं पाहता किंवा सुधाताईच्या लिटल थिएटरचे, किंवा मतकरींच्या बालनाट्याचे किंवा पुण्या-नागपूर-मधल्या एखाद्या संस्थेचं नाटक पाहता. हे नाटक पाहताना आप-णही नाटकात काम करावं असं तुम्हाला वाटणं सहाजिकच आहे. एखाद्याला राजाचं काम आवडतं, एखाद्याला विदूषकाचं काम आवडतं... एखाद्याला गड्याचं काम आवडतं... तर ही तुमची इच्छा पुरी करण्यासाठी आपल्याला काय करता येईल ते पाहू...

कधीही रंगमंचावर म्हणजे स्टेजवर न आलेल्या मुलाला एक-दम उभं केलं आणि सांगितलं, हं कर संवादाला सुरुवात, तर त्याची काय स्थिती होते ? तो घाबरतो. त्याच्या हातापायात कंप निर्माण होतो. थोडक्यात त्याची फजिती होते. मग ही फजिती तर व्हायला नको पण नाटकात तर काम करता आलं पाहिजे असं काही करता येईल का ? येईल. सुरुवातीला तुम्हाला

प्रकाशक :

**श्री. श्याम फडके**

राजचंद्र प्रकाशन

इंदिरा निवास, नौपाडा

ठाणे ४०० ६०२

© श्याम फडके १९७५

प्रथमावृत्ती दसरा १९७५

मुखपृष्ठ : रमेश मुधोळकर

सूचना : या पुस्तकातील प्रवेश विनापरवानगी करणे
ह्या कायदेशीर गुन्हा आहे याची नोंद घ्यावी.

[ सरकारी स्वस्त कागदाचा
या पुस्तकात वापर केलेला आहे.]

मुद्रक :

**श्री. र. भ. निगुडकर**

३९५/४ सदाशिव पेठ

पुणे ४११०३०

म. ग्रं. सं. ठाणे, ... क्र. ९६८६९ वा. वा ... नं. ... २३/०६

# ' नाट्याभिनयाचे विविध खेळ. '

मुलांनो,

तुम्हाला नाटक बघायला फार आवडतं. गणपती उत्सवात रोज रात्री तुम्ही नाटक बघायला पळत जाता. शाळेतल्या स्नेह-संमेलनातलं नाटक हौसेनं पाहता किंवा सुधाताईंच्या लिटल थिएटरचे, किंवा मतकरींच्या बालनाट्याचे किंवा पुण्या-नागपूर-मधल्या एखाद्या संस्थेचं नाटक पाहता. हे नाटक पाहताना आप-णही नाटकात काम करावं असं तुम्हाला वाटणं सहाजिकच आहे. एखाद्याला राजाचं काम आवडतं, एखाद्याला विदूषकाचं काम आवडतं... एखाद्याला गड्याचं काम आवडतं... तर ही तुमची इच्छा पुरी करण्यासाठी आपल्याला काय करता येईल ते पाहू...

कधीही रंगमंचावर म्हणजे स्टेजवर न आलेल्या मुलाला एक-दम उभं केलं आणि सांगितलं, हं कर संवादाला सुरुवात, तर त्याची काय स्थिती होते ? तो घाबरतो. त्याच्या हातापायात कंप निर्माण होतो. थोडक्यात त्याची फजिती होते. मग ही फजिती तर व्हायला नको पण नाटकात तर काम करता आलं पाहिजे असं काही करता येईल का ? येईल. सुरुवातीला तुम्हाला

यासाठीच छोटे छोटे खेळ खेळता येतील. ते घरी पाचसहा मुलांनी खेळावेत किंवा वर्गात सगळ्या मुलांनी खेळावेत. या खेळांतून हळूहळू भीड चेपत जाते आणि सरावानं माणूस सहज रंगमंचावर वावरू शकतो. म्हणजेच अशा खेळानं काय होईल ?

(१) मनोरंजन होईल.

(२) भीड चेपेल.

(३) तुमची इच्छा पुरी होण्याची वेळ जवळ येईल.

तेव्हा तुम्ही तयार व्हा. अपयशाची काळजी करू नका. लक्षात ठेवा, कोणाही व्यक्तीला अपयश पचविल्याशिवाय यश मिळालेलं नाही. तर आपण सुरुवात करूया...

## खेळ पहिला : नकला करणे

मुलांनो, एखाद्या शिक्षकाचे हावभाव, त्याच्या लकबी, त्याचे काही ठराविक शब्द इतके तुमच्या डोक्यात बसलेले असतात की, ते शिक्षक दिसल्याबरोबरच कशाला, नुसता त्यांचा विचार तुमच्या मनात आला तरी त्यांची नक्कल तुमच्या डोळ्यासमोर येते. एखादा मुलगा ती नक्कल वर्गात करतोही. सगळेच तसे धीट नसतात. तरी पण त्या मुलाने केलेली नक्कल तुम्हाला पटते.

तुम्ही हसता. तुम्ही नक्कल करीत नाही याचं कारण शाळेत शिक्षकांची भीती. आणि ती नक्कल नीट होणार नाही ही दुसरी भीती. तरी पण त्या शिक्षकाची नक्कल तुमच्या मनात होत असते. इथे एक गोष्ट स्पष्ट करायची आहे की **नक्कल म्हणजे टिंगल नव्हे.** तर बरहुकूम तसं वागणं, हालचाल करणं. आपण नकलेला हसतो, कारण त्यात एक प्रकारचं मनोरंजन आहेच. शिक्षकांचं राहू द्या. हा पाहा मोहन घरी बसला आहे. पण कान आहेत रस्त्याकडे. रस्त्यावरून कल्हईवाला–"कल्हय लावायची का कल्हय...."ओरडतोय. मोहन सहीन्सही त्याची नक्कल करतो. ती इतकी त्याला जमते की, त्याची धाकटी बहीण वर्षा त्या नकलेला हसतेय.

म्हणजेच–

* नक्कल करणं ही एक स्वाभाविक बालिश वृत्ती आहे.
* नक्कल करणं म्हणजे टिंगल नाही.
* चांगली नक्कल ही सर्वांत कठीण गोष्ट आहे.
* चांगली नक्कल पाहायला सगळ्यांनाच आवडतं.

या नकलेसाठी चांगली निरीक्षण शक्ती लागते, चांगली स्मरणशक्ती लागते आणि या दोन्ही गोष्टींबरोबर जर एखाद्या मुलाला निरनिराळे भाव दाखवण्याची शक्ती असेल तर तो

यासाठीच छोटे छोटे खेळ खेळता येतील. ते घरी पाचसहा मुलांनी खेळावेत किंवा वर्गात सगळ्या मुलांनी खेळावेत. या खेळांतून हळूहळू भीड चेपत जाते आणि सरावानं माणूस सहज रंगमंचावर वावरू शकतो. म्हणजेच अशा खेळानं काय होईल ?

(१) मनोरंजन होईल.

(२) भीड चेपेल.

(३) तुमची इच्छा पुरी होण्याची वेळ जवळ येईल.

तेव्हा तुम्ही तयार व्हा. अपयशाची काळजी करू नका. लक्षात ठेवा, कोणाही व्यक्तीला अपयश पचविल्याशिवाय यश मिळालेलं नाही. तर आपण सुरुवात करूया...

## खेळ पहिला : नकला करणे

मुलांनो, एखाद्या शिक्षकाचे हावभाव, त्याच्या लकबी, त्याचे काही ठराविक शब्द इतके तुमच्या डोक्यात बसलेले असतात की, ते शिक्षक दिसल्याबरोबरच कशाला, नुसता त्यांचा विचार तुमच्या मनात आला तरी त्यांची नक्कल तुमच्या डोळ्यासमोर येते. एखादा मुलगा ती नक्कल वर्गात करतोही. सगळेच तसे धीट नसतात. तरी पण त्या मुलाने केलेली नक्कल तुम्हाला पटते.

तुम्ही हसता. तुम्ही नक्कल करीत नाही याचं कारण शाळेत शिक्षकांची भीती. आणि ती नक्कल नीट होणार नाही ही दुसरी भीती. तरी पण त्या शिक्षकाची नक्कल तुमच्या मनात होत असते. इथे एक गोष्ट स्पष्ट करायची आहे की **नक्कल म्हणजे टिंगल नव्हे.** तर बरहुकूम तसं वागणं, हालचाल करणं. आपण नकलेला हसतो, कारण त्यात एक प्रकारचं मनोरंजन आहेच. शिक्षकांचं राहू द्या. हा पाहा मोहन घरी बसला आहे. पण कान आहेत रस्त्याकडे. रस्त्यावरून कल्हईवाला—"कल्हय लावायची का कल्हय...."ओरडतोय. मोहन सहीन्सही त्याची नक्कल करतो. ती इतकी त्याला जमते की, त्याची धाकटी बहीण वर्षा त्या नकलेला हसतेय. म्हणजेच—

* नक्कल करणं ही एक स्वाभाविक बालिश वृत्ती आहे.
* नक्कल करणं म्हणजे टिंगल नाही.
* चांगली नक्कल ही सर्वांत कठीण गोष्ट आहे.
* चांगली नक्कल पाहायला सगळ्यांनाच आवडतं.

या नकलेसाठी चांगली निरीक्षण शक्ती लागते, चांगली स्मरणशक्ती लागते आणि या दोन्ही गोष्टींबरोबर जर एखाद्या मुलाला निरनिराळे भाव दाखवण्याची शक्ती असेल तर तो

चांगली नक्कल करू शकतो. उदा. कल्हईवाल्याची नक्कल करणाऱ्या मुलाला त्याचं चालणं, चालता चालता ओरडणं, ओरडता ओरडता कानावर हात ठेवणं, कानावर हात ठेवता ठेवता टोपी सरकवणं....वगैरे बारकावे माहिती असायलाच हवेत.

दुसरी एक गोष्ट पाहा. ज्यांना घरात नकल्या म्हणतात ते सभाधीट असतातच असे नाही. चार लोकांसमोर नक्कल करणं ही सर्वांत कठीण गोष्ट आहे. ती जमण्यासाठी पुढील खेळ खेळावेत.

असं समजू की, चाळीस मुलांच्या वर्गामधे सहा मुलांना नाटकात काम करायची इच्छा आहे. त्यासाठी ही मुलं योग्य तो प्रयत्न प्रामाणिकपणे करायला तयार आहेत. आता या सहा मुलांनी सहा नकला निवडायच्या. उदा.

(१) कल्हईवाल्याची नक्कल

(२) दारुड्याची नक्कल

(३) वेड्या माणसाची नक्कल

(४) बोबड्या माणसाची नक्कल

(५) भाजीवालीची नक्कल

(६) टांगेवाल्याची नक्कल

आता या सगळ्या एकपात्री नकला आहेत. पहिल्या दिवशी सहा जणांनी चिठ्ठी टाकून आपण कोणती नक्कल करायची ते ठरवावं. नंतर पाच मिनिटं नकलेचं मनन करावं.

नंतर सहापैकी एकानं सुरुवात करावी. उरलेल्या पाच मुलांनी त्या नक्कल करणाऱ्या मुलाचं नाव व नकलेचं नाव एका कागदावर लिहावं आणि एकूण तीस पैकी मार्क द्यावेत.

मार्क देण्यासाठी पुढील तक्ता वापरावा।

(१) नक्कल करणारा शेवटपर्यंत धीटपणे उभा राहिला का ?

(२) त्याचे बोलणे कसे होते ?

(३) त्याचा अभिनय कसा वाटला ?

(४) एकूण त्याची नक्कल तुम्हाला किती आवडली ?

(५) त्याचा वेष नकलेस योग्य होता का ?

(६) त्याच्या हालचाली नकलेस योग्य होत्या का ?

वरच्या प्रत्येक प्रश्नाला पाच पैकी मार्क द्या. काही दिवसांनी या सहा जणांनी पुन्हा चिठ्ठ्या टाकून याच नकला परत कराव्यात। मात्र एकदा नक्कल झाली की तीच त्यास परत येऊ देऊ नका। असं सहाही वेळा करा. तुमच्याच लक्षात येईल की, सहाव्या वेळी पहिल्या वेळेपेक्षा तुमची बरीच प्रगती झाली असेल.

आता हा खेळ खेळताना, समजा, एखाद्या मुलाला त्याची इच्छा असूनही काहीही करता आले नाही तरी त्याला हसू नका. त्याला धीटपणे सर्वांपुढे एक वाक्य म्हणायला सांगा, ‘ मला ही नक्कल करता येत नाही. ’ कदाचित तो दुसऱ्या खेपेस चांगली नक्कल करील. तर मग चला, बघा हा खेळ खेळून !

## खेळ दुसरा : प्रसंगाभिनय करणे

हा पहिल्या खेळापेक्षा सोपा खेळ आहे. यात मुलांच्या दोन टीम ( गट ) पाडाव्यात आणि त्यांत स्पर्धा लावावी. स्पर्धेसाठी पुढील प्रसंग फळ्यावर जाहीर करावेत.

विषय : **भांडण. वेळ फक्त दोन मिनिटं.**

प्रसंग १ ला– आंब्याच्या झाडाखाली सापडलेल्या कैरीवरून चार मुलं भांडताहेत.

प्रसंग २ रा– घरामध्ये चॉकलेटवरून भावाबहिणीचं भांडण झालं.

प्रसंग ३ रा– वर्गात शर्टावर शाईचा डाग पाडला म्हणून मुलांमध्ये झालेलं भांडण.

प्रसंग ४ था– रस्त्यातलं भांडण. (एका सायकलस्वारानं पादचाऱ्यास धक्का दिला.)

या चार प्रसंगांपैकी प्रत्येक टीमनं दोन प्रसंग निवडावेत. आणि एका वेळीं ते सादर करावेत.

आता हे प्रसंगाभिनय करण्यासाठी–

(१) एकापेक्षा अनेक मुलं या खेळास लागतात.

(२) बरीच मुलं रंगमंचावर असल्यामुळे भीती कमी होते.

(३) उत्स्फूर्त बोलणं असल्यामुळं संवादाची कल्पना येते. संवाद म्हणजे निबंध नाही; संवाद म्हणजे बोजड वाक्यं नाहीत, हे समजतं.

(४) एकावेळी अनेक पात्रं असल्यानं त्यांच्या सहवासानं आपोआप बोलणं, चालणं, हावभाव करणं जमून जातं.

आता यातला एक प्रसंग आपण घेऊ.

प्रसंग दुसरा–

घरामध्ये चॉकलेटवरून भावा-बहिणीचं भांडण.

आता हा प्रसंग दोन मुलांनी सादर करावयाचा आहे. तो कसा करावा ? प्रथम या गोष्टी पाहा–

(१) प्रत्येक प्रसंगाला चांगली सुरुवात असावी.

(२) प्रत्येक प्रसंगातली परिणामकारकता वाढती असावी.

(३) प्रसंगाचे संवाद पोषक असावेत.

(४) शेवट चांगला असावा.

आता हे सगळं दोन मिनिटांत साधता येईल का ?

येईल.

पाहा : सुरुवात. एक चांगला गुटगुटीत पोऱ्या रंगमंचावर उभा आहे. त्याच्या तोंडात काहीतरी चांगली गोड वस्तू आहे. तो ती आनंदानं खातोय. शिवाय एका बाजूकडे पुन्हा पुन्हा पाहून खातोय. डोळे मिचकावतोय, (गालात जीभ अडकवून तोंडात मस्तपैकी चॉकलेट खातो आहे असं दाखवतोय.)

किंचित वेळानं त्याची बहीण तरातरा येते.

बहीण : कायरे दादिटल्या, माझं चॉकलेट खाल्लंस ?

दादा : छे. मी मुळीच खाल्लं नाही.

बहीण : मग आ ऽऽ कर बघू.

दादा : अंहं.

बहीण : (मोठ्यानं) दादिटल्या मी आईला सांगीन हं. (ती आईला हाका मारते.)

असं भांडण वाढत जातं. शेवटी तो खिशातलं एक न खाल्लेलं चॉकलेट दाखवतो. दोघांची झोंबाझोबी होते—आणि दोघं एकदम एका बाजूकडे पाहून थांबतात. तो तिला चॉकलेट देतो. ती खाते.

तो मुलगा एकच वाक्य म्हणतो, " हे बघ आई, मी तिला देतच होतो. "

प्रसंग संपला.

अशा रीतीनं सादर केलेला प्रसंग परिणामकारक होतोच.

आता या प्रसंगाला मागच्या खेळाप्रमाणेच मार्क द्यावेत आणि कोणत्या गटाला जास्त मार्क मिळतात हे पाहावे.

प्रसंगांची यादी मुलांनाही करता येईल किंवा शिक्षकही करू शकतील.

मी आणखी एक यादी देतो.

विषय–भीती. वेळ एक मिनिट. मुलं ६–७

प्रसंग १– घरात रात्री चोर शिरला.

प्रसंग २– तुमच्या रेल्वे डब्याला आग लागली.

प्रसंग ३– धरणीकंप होणार हे समजलं.

प्रसंग ४– जगबुडी होणार.

प्रसंग ५– तुमची बोट बुडत आहे.

प्रसंग ६– घरात विषारी नाग फिरतोय.

आता दुसरे खेळ दुसऱ्या पुस्तकात !

या सेरीजमध्ये काय येईल हे मी पुढे देत आहेच. याखेरीज

पुढच्या सेरीजमध्ये–इंग्रजी, हिंदी, संस्कृत भाषेतीलही प्रवेश आहेत. तर मग त्या सेरीजची आजच मागणी करून ठेवा आणि खेळाला सुरुवात करा.

मुलांनो,

शाळेच्या स्नेहसंमेलनासाठी तुम्ही नाटकाचे प्रवेश बसवता–त्यासाठी तुम्ही काय करता ?

(१) प्रवेशाची निवड करणे.

(२) त्यासाठी योग्य पात्रयोजना करणे.

(३) मार्गदर्शनासाठी शिक्षकास विचारणे ( किंवा बहुतेक वेळा शिक्षकच प्रवेश निवडून मुलं निवडण्याचे काम करतात.)

(४) कपडे, रंगमंच, संगीत, प्रकाश या गोष्टी पाहणे.

(५) तालीम करून नाटक बसवणे.

एवढं झाल्यावर तुम्ही प्रवेश सादर करता. यासाठी आता मी एक प्रवेश देत आहे. हा प्रवेश तुम्हाला शाळेच्या स्नेहसंमेलनातही करता येईल, किंवा गणेशोत्सवातही करता येईल. शिवाय तुमच्या प्रत्यक्ष वर्गातही करता येईल. हा प्रवेश ऐतिहासिक असून यात फक्त दोनच पात्रे आहेत. यासाठी खास असा रंगमंच नको. फक्त एक बैठक हवी. या प्रवेशाचे नाव आहे—

# बाळराजे आणि राजमाता

यातील एक पात्र आहे बाल शिवाजीराजे आणि दुसरे पात्र राजमाता.

आता हा प्रवेश स्नेहसंमेलनात किंवा गणेशोत्सवात किंवा एखाद्या स्पर्धेत करायचा असेल तर तुम्ही काय कराल ?

बाल शिवाजीला सॅटीनची सुरवार, सॅटीनचा अंगरखा, कमरेला तलवार, पट्टे, डोक्यावर शिवाजीचा जिरेटोप, गळ्यात मोत्यांची माळ, कानात कुंडलं, मनगटावर पट्टे, पायात मखमली मुजोडी हे कपडे एखाद्या कपडे भाड्याने देणाऱ्या दुकानातून आणावेत.

राजमातेसाठी नऊवारी जरीचा शालू असावा. त्याला योग्य असा ब्लाऊज असावा. तिची डोक्यावरून पदर घ्यायची पद्धत– शालू नेसण्याची पद्धत नीट समजावून घ्यावी. गळ्यातले, दंडावरचे अलंकार आणावेत. मात्र हाच प्रवेश केवळ वर्गातल्या मुलांसमोर करावयाचा आहे, तर त्यासाठी बालशिवाजीला सुरवार व झब्बा चालेल. पुठ्ठ्याची तलवार करावी. जिरेटोप नसला तरी चालेल. राजमातेसाठी नऊवारी शालू मिळू शकेल.

**पात्रयोजना**–साधारण ४ थी–५ वीतल्या एखाद्या लहान चुणचुणीत मुलाला बालशिवाजी करावा. इयत्ता ९ वी १०तल्या

मुलीला राजमाता बनवावे. आणखी एखाद्या लहान मुलाला निवेदक बनवावा.

**रंगमंच**–खास काहीही नको. बैठकीसाठी एखादे लहान बाक मांडून त्यावर गालीचा घालावा.

**दिग्दर्शन सूचना**–या प्रवेशात दोघांचे संवाद आहेत. त्यामुळे दोघं एकाच ठिकाणी बसून बोलत राहिले तर प्रवेश कंटाळवाणा होईल. यासाठी एक पात्र हालते ठेवावे. ज्यावेळीं राजमाता बालराजांना गोष्ट सांगायला सुरुवात करते तेव्हा राजमातेस बाळराजांना बरोबर घेऊन हळूहळू रंगमंचाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत गोष्ट सांगत सांगत जाण्यास सांगावे.

ज्यावेळेस बालराजे गोष्ट संपेपर्यंत 'आम्ही बोलणार नाही' म्हणतो त्यावेळेस त्याला बैठकीवर मांडी घालून तोंडावर बोट ठेवून बसायला सांगावे. ज्यावेळेस राजमाता बालशिवाजीस म्हणते.....

....आणि ते राजे झाले. त्यावेळी तिनं मातृप्रेमानं बाळराजास उचलून बैठकीवर बसवावे.

**संगीत**–सुरुवातीस आणि शेवटी सनईचा उपयोग करावा.

हा सर्व प्रवेश कमीतकमी दहा मिनिटे झाला पाहिजे हे सगळं झाल्यावर पुढील घोषणा करा.

× × × सादर करीत आहे–

## बाळराजे आणि राजमाता

लेखक– श्याम फडके

दिग्दर्शक–

पात्रपरिचय–निवेदक :

बाळराजे–

राजमाता–

संगीत व्यवस्था–

रंगभूषा–

यानंतर प्रवेशास सुरुवात करावी.

पडदा उघडल्यावर निवेदक पुढे येतो आणि प्रेक्षकांशी बोलू लागतो—

निवेदक : नमस्कार मुलांनो. आपण ज्या महाराष्ट्रात राहातो तो पूर्वी सोन्यामोत्याने मढलेला होता. परंतु १३१३ साली या

राज्यात सुलतानशाही आली. त्याने आपल्या या महाराष्ट्राची दुर्दशा झाली. सगळी लोकं गुलाम झाली, लाचार झाली. हे असं किती वर्ष चाललं ? एक दोन वर्ष–नाही, तीनशे वर्ष. तीनशे वर्षांनंतर म्हणजे १६३० साली आपल्या महाराष्ट्रात एक महान पुरुष जन्माला आला. १९ फेब्रुवारी १६३० रोजी, म्हणजे फाल्गुन वद्य तृतीयेला, शिवनेरी किल्ल्यावर शिवाजी महाराजांचा जन्म झाला. त्या दिवशी शुक्रवार होता. वेळ संध्याकाळी सूर्यास्तानंतरची होती.

मुलांनो, या बाळाची एक गोष्ट आपण पाहाणार आहोत. माणसाचं मूल एका रात्रीत मोठं होत नाही. तसं बालराजे शिवाजीही एका रात्रीत मोठे झाले नाहीत. त्यांच्या मनावर हळूहळू संस्कार होत गेले. ते संस्कार करण्याचं काम जिजाबाईंनी केलं.

या बाईंनी महाराजांना कसं शिकवलं ते आपण या प्रवेशात पाहू या.

(निवेदक जातो. आता सनईचे सूर सुरू होतात. एका बाजूनं राजमाता येऊन बैठकीवर बसते. थोड्या वेळानं दुसऱ्या बाजूनं बाळराजे हाक मारतात.)

बाळ० आईसाहेब–

जिजा० कोण, बाळराजे ? या. (येतो. आईजवळ जातो.)

बाळ० आईसाहेब, आम्हाला एखादी गोष्ट सांगा. ना ?

जिजा० कोणती गोष्ट सांगू, बाळराजे ? काऊ-चिऊची ?

बाळ० अंहं.

जिजा० वाघ-सिंहाची ?

बाळ० नको.

जिजा० मग ताऱ्यांची आणि पऱ्यांची ?

बाळ० तीही नको.

जिजा० राक्षसाची ?

बाळ० मुळीच नको.

जिजा० मग कोणती गोष्ट सांगू, बाळराजे ?

बाळ० आईसाहेब, आम्हाला माणसाची गोष्ट सांगा. अशी गोष्ट सांगा की ज्यात तुमच्यासारखी एक आई आहे आणि माझ्यासारखा एक मुलगा आहे.

जिजा० का बाळराजे, तुम्हाला दुसऱ्या गोष्टी आवडत नाहीत ?

बाळ० नाहीत. आईसाहेब, काल आमचा एक दोस्त आम्हाला राक्षसाची गोष्ट सांगत होता. आम्ही त्याला म्हटलं,

आम्हाला राक्षस दाखव. त्यावर तो म्हणाला, राक्षस दिसत नसतो. मग आम्ही त्याला म्हटलं, जो आम्हाला दिसत नाही त्याची गोष्ट आम्ही ऐकत नाही.

जिजा० शाबास, बाळराजे.

बाळ० मग तुम्ही आम्हाला एखादी चांगली गोष्ट सांना ना. त्या दिवशी तुम्ही आम्हाला रामाची गोष्ट सांगितलीत, ती आम्हाला फार फार आवडली. तुम्ही सांगितलंत राम, लक्ष्मण आणि सीता या इथून गेले. खरं ना !

जिजा० होय, बाळराजे. अयोध्येचा राजा राम, त्याची बायको सीता आणि भाऊ लक्ष्मण या इथूनच गेले.

बाळ० मग आईसाहेब, त्यांची पावलं या मातीत दिसतील का ?

जिजा० दिसतील.

बाळ० (आनंदानं) आईसाहेब, खरंच दिसतील ?

जिजा० खरंच दिसतील.

बाळ० देवाची पावलं या मातीत दिसतील ?

जिजा० दिसतील. पण ती अशी सहज दिसणार नाहीत. ती शोधावी लागतील.

बाळ० मी शोधीन, आईसाहेब.

जिजा• मोठं झाल्यावर तुम्हाला तेच करायचंय....(स्वतःशीच पुटपुटत राहते) देवाचीच पावलं शोधायची आहेत, या मातीत... (बाळराजे तिला हलवतात)

बाळ० आईसाहेब, आम्हाला गोष्ट सांगता ना ?

जिजा० सांगते. ऐका. (त्याला बरोबर घेऊन फेऱ्या मारू लागते.) माझ्यासारखी एक आई होती.

बाळ० आणि तिला माझ्यासारखा एक मुलगा होता.

जिजा० हं पण तुमच्यासारखा एकच नाही, तर पाच मुलगे होते. म्हणजे ते पाची एकमेकांचे भाऊ होते.

बाळ• मग आम्हाला का पाच भाऊ नाहीत !

जिजा०बाळराजे, मी गोष्ट सांगू की नको ?

बाळ० सांगा, आईसाहेब !

जिजा० मग तुम्ही मधे बोलायचं नाही.

बाळ० आणि आम्हाला काही विचारायचं असलं तर ?

जिजा० ते नंतर विचारा.

बाळ० ठीक आहे. नंतर विचारीन. सांगा आता. गोष्ट संपेपर्यंत आम्ही एक शब्द बोलणार नाही. सांगा. (जिजाबाई गोष्ट सांगू लागते.)

जिजा० एक होतं गाव. गावाचं नाव होतं हस्तिनापूर. तिथे एक राजा होता. त्याचं नाव पंडू. त्याची एक राणी होती. तिचं नाव होतं कुंती. काय नाव होतं? (बाळराजे मानेनं 'नाही सांगणार' म्हणतात. जिजाबाई त्यांची समजूत घालते.) असं नाही बाळराजे, कोणी विचारलं की सांगायचं. तर मग बोला.

बाळ० (धडाधड) एक होता राजा, त्याचं नाव पण्डू. एक होती राणी, तिचं नाव कुंती.

जिजा० शाबास. तर त्या कुंतीला पाच मुलगे होते. धर्म, भीम, अर्जुन, नकुल आणि सहदेव—सांगा. (सांगतो.) धर्म हा सगळ्यांत मोठा हुषार होता. सगळेजण त्याला मान देत.

बाळ० म्हणजे काय करीत?

जिजा० कुठे बाहेर जायचं झालं तर त्याची परवानगी घेत. त्याला विचारीत—धर्मदादा मी बाहेर जाऊ का?

तो जा म्हणाला तर जायचं.

बाळ० आणि तो नाही म्हणाला तर?

जिजा० तर जायचं नाही. त्याचं ऐकायचं.

बाळ० आईसाहेब, आम्हाला असा एक धर्मदादा आणा ना.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ९६८६५ नों. दि. 7/3/14
वि. ...... ......... ...............

जिजा० कशाला बाळराजे ?

बाळ० आम्ही त्याचं ऐकू. आम्ही त्याच्याबरोबर खेळू. आई-साहेब, आम्ही मातीचे किल्ले खेळतो तेव्हा आम्हीच राजे होतो. पण आम्हाला एखादा धर्मदादा असता तर आम्ही त्याच्याबरोबर राहिलो असतो. त्याचं ऐकलं असतं. मग तुम्ही आणाल ना धर्मदादा ?

जिजा० (हसून) बाळराजे, धर्मदादा आणता येत नाही.

बाळ० मग आम्ही कोणाचं ऐकणार ?

जिजा० माझं ऐका. गोष्ट पुढे. दुसरा होता भीम. काय होतं नाव ?

बाळ० भीम.

जिजा० शाबास. याच्या अंगात खूप शक्ती होती.

बाळ० केवढी शक्ती होती ?

जिजा० खूप होती. एखाद्या हत्तीएवढी !

बाळ० बापरे ! हत्तीएवढी ?

जिजा. हं. तो नेहमी कुस्ती खेळायला तयार असे. त्याच्या हातात नेहमी गदा असे.

बाळ० पण त्याच्याबरोबर कुस्ती खेळणार कोण ?

जिजा० हो ना. कुणीही खेळायला तयार होत नसे. कारण तो सगळ्यांना कुस्तीत हरवायचा.

बाळ० अगदी धर्मदादाला सुद्धा.

जिजा० धर्मदादाशी कुस्ती कशाला ? भीम दुष्ट लोकांशी लढाई खेळायचा. त्यानं एकदा बकासूर नावाच्या राक्षसाला ठार मारलं.

बाळ० आईसाहेब, राक्षस असतात का हो ?

जिजा० असतात.

बाळ० मग मला दाखवा ना राक्षस.

जिजा० दाखवीन. पण तुम्ही त्याच्याबरोबर काय करणार ?

बाळ० मी भीमासारखी ताकद मिळवून बकासुरासारखे राक्षस मारून टाकीन.

जिजा० शाबास. भीम असंच करायचा. तो एकदा आपली गदा गरगरा फिरवायला लागला की सगळेजण घाबरून पळत, इतका तो ताकदवान होता.

बाळ० म्हणजे धर्मदादा झाला. दुसरा भीम झाला. पुढे ?

जिजा० तिसऱ्या भावाचं नाव अर्जुन. काय ?

बाळ० अर्जुन.

जिजा० हं. हा लढाई करण्यात फार हुषार होता.

बाळ० त्याच्याजवळ तलवार होती ?

जिजा० अंहं. त्याच्याजवळ धनुष्यबाण होता. एकदा त्यानं धनुष्याला बाण लावला की त्याचा नेम बरोबर बसलाच. एकदा एक पैज लागली. एका ठिकाणी जमिनीवर ठेवली परात. परातीत ठेवलं पाणी. आणि बऱ्याच शूर शूर माणसांना बोलावून सांगितलं की, या परातीतल्या पाण्यात पाहून वर छताला एक फिरता मासा टांगलेला आहे,त्याचा एक डोळा फोडायचा.

बाळ० बापरे...बघायचं पाण्यात आणि फिरत्या माशाचा डोळा फोडायचा ! मग काय झालं ?

जिजा० सगळे थकले. पण अर्जुनानं डोळा फोडला.

बाळ० बाण मारून ?

जिजा० हं. पाण्यात पाहून, बाण मारून डोळा फोडला. असा शूर होता तो.

बाळ० आईसाहेब, असा अर्जुन आपल्याकडे का नाही ?

जिजा. बाळराजे, अर्जुनासारखा योद्धा होणं सोपं नाही.

बाळ० का सोपं नाही ?

जिजा० ते सांगणही सोपं नाही.

बाळ० पुढे काय झालं ?

जिजा० तर हा अर्जुन फार शूर होता. कोणीही त्याच्याशी लढाई करायला तयार होत नसे. 'अर्जुनाशी का लढाई ? मग नको रे बाबा,' असं सगळे म्हणत.

बाळ० (हसत) भित्रे होते सगळे !

जिजा० सगळे भित्रे नव्हते. पण अर्जुन फार शूर होता, पराक्रमी होता. यानंतर नकुल आणि सहदेव. हेही शूर होते. या सगळ्यांचा त्यांच्या आईला म्हणजे कुंतीला फार अभिमान वाटे.

बाळ० अभिमान म्हणजे काय ?

जिजा० तिला आनंद होई. भीमानं बकासूर मारला तर त्याची आई काय म्हणेल ? पाहा, माझ्या मुलानं राक्षस मारला. माझा अर्जुन पराक्रमी आहे...ज्या आईची मुलं अशी शूर, पराक्रमी निघतात त्या आईला फार आनंद होतो. कुंतीची मुलं अशी शूर निघाली, हुषार निघाली. त्यांनी राज्य केलं आणि ते राजे झाले.

बाळ० आईसाहेब, एक विचारू ?

जिजा० विचारा ना.

बाळ० राजे म्हणजे काय, आईसाहेब ?

जिजा० आम्ही तुम्हाला काय हाका मारतो ?

बाळ० बाळराजे.

जिजा० म्हणजे यातही राजे हा शब्द आहे. तुम्ही शूर सरदाराचे पुत्र आहात. म्हणून राजे. राजा सगळ्यांत मोठा माणूस. सगळेजण त्याचं ऐकतात.

बाळ० तुम्ही कोणाचं ऐकता, आईसाहेब ?

जिजा० बाळराजे मी सांगू की नको ?

बाळ० म्हणजे ! आम्ही काय केलं ?

जिजा० असं मधेमधे विचारू नये.

बाळ० बरं सांगा.

जिजा० सगळेजण राजाला देवासारखं मानतात.

बाळ० म्हणजे त्याची पूजा करतात ?

जिजा० पूजा नाही करीत–त्याला नमस्कार करतात, मुजरा करतात. राजा आला की सगळे उभे राहातात. त्याला मान देतात.

बाळ० हे कशाकरता ?

जिजा० कारण त्यानं लोकांची काळजी करायची. त्यांना प्रेमानं

वागवायचं. खायला-प्यायला द्यायचं. त्यांचं रक्षण करा-
यचं. त्याच्यामुळे सगळ्यांना सुख मिळालं पाहिजे.
कुंतीच्या मुलांनी हे केलं.

बाळ० सगळ्या मुलांनी केलं ?

जिजा० सगळ्यांनी केलं. म्हणून तिला आनंद झाला. ती राजांची आई म्हणजे राजमाता झाली. या गोष्टीचा तिला अभि-मान वाटू लागला.

बाळ० मग आईसाहेब, तुम्हीही राजमाता होणार ?

जिजा० काय, बाळराजे ?

बाळ० आपणही त्या कुंतीसारखी राजमाता होणार ?

जिजा० तुम्हाला मी राजमाता व्हावं असं वाटतंय ?

बाळ० होय, आईसाहेब.

जिजा० पण त्यासाठी तुम्हाला अर्जुन व्हायला हवं.

बाळ० मी होईन.

जिजा० ( आनंदानं ) काय म्हणालात, बाळराजे ! पुन्हा बोला.

बाळ० मी अर्जुन होईन.

जिजा० पुन्हा सांगा—

बाळ० मी अर्जुन होईन.

जिजा० शाबास, बाळराजे.

बाळ० मला धर्मदादासारखा एखादा दादा मिळाला असता तर मी त्याला मदत केली असती. भीमदादासारखा एखादा शूर दादा मिळाला असता तर मी त्याच्यापासून गदा शिकलो असतो. तरीपण आईसाहेब, आपण काळजी करू नका. मी अर्जुन होईन. तो अर्जुन धनुष्यबाणांनी लढला; मी तलवारीने लढेन. ( तलवार उपसून आवेशानं ) असा लढेन की तुमच्या गोष्टीतल्या अर्जुनाप्रमाणं सगळे म्हणाले पाहिजेत, "कोण, शिवाजी का लढतोय ? मग नको रे बाबा त्याच्याबरोबर लढणं!"

जिजा० तथास्तु....

( पडदा पडतो. नंतर पुन्हा शेवटी सनईचे सूर ऐकू येतात. )

---


## दुसऱ्या भागात

### २ नाट्यछटा

### आणि

### एक प्रवेश

हे पुस्तक तुमच्याजवळ हवंच.

**किंमत फक्त १ रुपया**

शिक्षक बंधूंनो,

या पुस्तिकेद्वारे मी आपणांस भेटतोय. हा माझा एक प्रयत्न आहे. तो परिपूर्ण नाही याची मला जाणीव आहेच. आपल्या सहकार्यानं त्यात सुधारणा व्हावी अशी इच्छा आहे. आपण कृपया पुढील मुद्यांवर लिहाल का ?

(१) हे पुस्तक कसे वाटले ?

(२) यातील लिखाणाप्रमाणे केलेले प्रयोग यशस्वी झाले का ?

(३) यात कोणती सुधारणा हवी ?

(४) तुम्हाला काय हवे ?

आपण लिहावे. मी जरूर आपल्या बहुमोल सूचनांचा समावेश पुढच्या सेरीजमध्ये करीन.

IRBK-0116865

IRBK-0116865

आपला
श्याम फडके

(वि. सू. शिक्षकांनी मागविलेल्या सेटस्‌वर व्यापारी कमिशन दिले जाते. माहितीसाठी लिहा.)

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ९६८६६ नों. दि. ३१-३-८८
वि. ना. ना. ... भा. ...

मुलांनो,

ही तुमच्यासाठी लिहिलेली सेरीज. ही मी माझ्या शालेय जीवनातल्या अनुभवावरून तयार केलेली आहे. यात तुम्हाला काही अडचण आली असेल तर तुम्ही माझ्या पत्त्यावर जरूर लिहा. मी ती अडचण दूर करण्याचा प्रयत्न करीन.

दुसरं–रंगदेवतेला नमस्कार करा. तिचा, गुरुजींचा आशीर्वाद घ्या. जर माझ्या या पुस्तकातला प्रवेश स्नेहसंमेलन, स्पर्धा, किंवा उत्सवात स्टेजवर करणार असाल तर लेखक मानधन रुपये तीन माझ्या पत्त्यावर पाठवा. (पोस्टल ऑर्डर पाठवा किंवा मनिऑर्डर पाठवा.) त्यावेळी पुढील माहिती कळवा.

प्रवेशाचे नाव. करणाऱ्याचे नाव व पत्ता. दिनांक– (प्रयोगाची) जागा.

मी परवानगी पाठवीन. (परवानगीशिवाय प्रयोग करू नका.)

श्याम फडके
इंदिरा निवास
नौपाडा ठाणे ४० ६०२

ही पुस्तके प्रत्येक मुलाजवळ हवीतच

# बालरंगभूमी

सेरीज पहिली : पाच भाग

प्रत्येक भागाची किंमत फक्त १ रुपया

सुप्रसिद्ध नाटककार श्याम फडके
यांच्या लेखणीची धमाल

या सेरीजमध्ये काय मिळेल ?

भाग १ ला– नकलास्पर्धा, प्रसंगाभिनय + एक प्रवेश
,, २ रा– दोन नाट्यछटा + दोन प्रवेश
,, ३ रा– पुतळे, स्वगते + दोन प्रवेश
,, ४ था– ताल, दमछाट + दोन प्रवेश
,, ५ वा– एक संमिश्र नाटिका

राजचंद्र प्रकाशन,
द्वारा : श्याम फडके, नौपाडा, ठाणे ४००६०२
या पत्त्यावर पाच रुपये पाठवा–बुकपोस्टाने पुस्तके घरी.

## राजचंद्र प्रकाशनाची घोडदौड

**बालरंगभूमी–पहिली सेरीज : भाग १ ते ५ (प्रसिद्ध झाली)**
( हसतखेळत शिकवलेले नाट्यशास्त्र )
दुसरी सेरीज : भाग ६ ते १० (लवकरच येणार)
तिसरी सेरीज : भाग ११ ते १५ (येणार)

**या शिवाय**

## चावट चंदूची साहसकथा

सेरीज पहिली – भाग १ ते ५ छापत आहे.

**या शिवाय दुसऱ्या अन्य सेरीज**
**या सर्व साहित्याचे लेखक**
**नाटककार श्याम फडके**

प्रत्येक पुस्तकाची किंमत फक्त १ रुपया

पाच रुपये पाठवा आणि बुकपोस्टाने पुस्तके मिळवा.

लिहा

**राजचंद्र प्रकाशन**
C/o **श्याम फडके**, इंदिरा निवास, नौपाडा, ठाणे ४०० ६०२

एक भेट योजना कूपन

# बालरंगभूमी

## दुसरी सेरीज : पाच पुस्तके

किंमत प्रत्येकी एक रुपया

लेखक : श्याम फडके

---

श्री. श्याम फडके,

इंदिरा निवास, नौपाडा, ठाणे यांस

वि. वि.

मला आपली दुसरी सेरीज पुढील पत्त्यावर बुकपोस्टाने पाठवून द्यावी. सेरीज तयार झाल्याचे आपले पत्र आल्याबरोबर मी रुपये पाच आपणाकडे मनिऑर्डरने पाठवीन.

आपला

पत्ता :